NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १८६ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत

## शनिवार, दि. ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२:३० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८६ वी (तातडीची) बैठक **शनिवार, दि.०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे प्रत्यक्ष व Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १८) | डॉ. नलिनी टेंभेकर<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

तसेच प्रा. (डॉ.) प्रकाश महानवर यांना कुलगुरु या पदावर रुजू होऊन एक वर्ष पूर्ण झाल्याने त्यांचे सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्याचप्रमाणे वित्त व लेखा अधिकारी या पदावर नव्याने रुजू झालेले सीए महादेव सोमशंकर खराडे यांची व नवनियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे व प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | १. दि. १० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८५ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.१० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.१८(१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | कायदा विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता पॅनेल ॲडव्होकेट म्हणून सर्वानुमते खालीलप्रमाणे नावे निश्चित करण्यात आली.<br>अ) मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. उच्च न्यायालय, मुंबई चे छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथील प्रकरणांकरिता पॅनल ॲडव्होकेटचा तपशील.<br>१. ॲड. श्री. पी. एन. जोशी<br>२. ॲड. श्री. आय. एम. खैरदी<br>३. ॲड. श्री. एस. डी. ठोकडे<br>४. ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी<br>५. ॲड. सचिन देशमुख<br>६. ॲड. श्री. आनंद चावरे<br>७. ॲड. श्री. रूपेश कुमार सी.<br>८. ॲड. रामदास हाके पाटील<br>९. ॲड. ए. एस. राव<br>१०. ॲड. मंकुवार मिलिंद देशमुख<br>११. ॲड. राजशेखर संगप्पा आळंगे<br>१२. ॲड. अंजली नील हेलेकर<br>१३. ॲड. मनीष केळकर<br>१४. ॲड. असदुल्लाह मो. सलिम शेख<br>१५. ॲड. सागर गणपत तळेकर<br>१६. ॲड. विक्रांत विश्वनाथ फताटे<br>१७. ॲड. प्रशांत चंद्रकांत कांबळे<br>१८. ॲड. उमेश कुरुंद<br>१९. ॲड. प्रतिभा दादासाहेब शेळके<br>२०. ॲड. संजीव कदम<br>२१. ॲड. अविनाथ अघाव<br>२२. ॲड उदय मालते | |

ब) मे. जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर व सोलापूर येथील इतर न्यायालय व तसेच विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे येथील प्रकरणांकरिता.

१. ॲड. श्री. एस. व्ही. उजळंबे
२. ॲड. श्री. व्ही. वाय. पांढरे
३. ॲड श्री. प्रविण शेंडे
४. ॲड. श्री. निशिकांत देगावकर
५. ॲड. श्री. निलेश ठोकडे
६. ॲड. श्री. संतोष न्हावकर
७. ॲड. बसवराज एस. सलगर
८. ॲड. सुनिल रामचंद्र बनसोडे
९. ॲड. अमोल शिवानंद कळके
१०. ॲड. पांडुरंग लक्ष्मीकांत देशमुख
११. ॲड. गवई लक्ष्मीकांत अनंतराव
१२. ॲड. सचिन राजेंद्र लोमटे
१३. ॲड. विजय आर. देशपांडे
१४. ॲड. श्रेयांक सुरेशबाबू मंकणी
१५. ॲड. लक्ष्मण बाळासाहेब पाटील
१६. ॲड. आकाश देठे
१७. ॲड. सुचिता रामचंद्र ईवरे

१) प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता गठीत करण्यात वरील ॲडव्होकेट पॅनलमध्ये नवीन वकीलांची नावे समाविष्ट करण्याबाबतचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना देण्यात आले.

२) वरीलप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या पॅनलची मुदत तीन वर्ष राहील. तदनंतर पुढील आढावा घेवून पॅनलची मुदत वाढविण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदय यांना देण्यात आले.

दुरुस्त केलेला ठराव

**प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता पॅनेल ॲडव्होकेट म्हणून सर्वानुमते खालीलप्रमाणे नावे निश्चित करण्यात आली.**

**अ) मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. उच्च न्यायालय, मुंबई चे छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथील प्रकरणांकरिता पॅनल ॲडव्होकेटचा तपशील.**

**१. ॲड. श्री. पी. एन. जोशी**
**२. ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी**
**३. ॲड. सचिन देशमुख**
**४. ॲड. श्री. आनंद चावरे**
**५. ॲड. श्री. रूपेश कुमार सी.**
**६. ॲड. रामदास हाके पाटील**
**७. ॲड. ए. एस. राव**
**८. ॲड. राजशेखर संगप्पा आळंगे**
**९. ॲड. अंजली नील हेलेकर**
**१०. ॲड. मनीष केळकर**
**११. ॲड. असदुल्लाह मो. सलिम शेख**
**१२. ॲड. सागर गणपत तळेकर**
**१३. ॲड. विक्रांत विश्वनाथ फताटे**

| | | |
|---|---|---|
| | १४. ॲड. प्रशांत चंद्रकांत कांबळे<br>१५. ॲड. उमेश कुरुंद<br>१६. ॲड. प्रतिभा दादासाहेब शेळके<br>१७. ॲड. संजीव कदम<br>१८. ॲड. अविनाश अघाव<br>१९. ॲड उदय मालते<br>ब) मे. जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर व सोलापूर येथील इतर न्यायालय व तसेच विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे येथील प्रकरणांकरिता.<br>१. ॲड. श्री. एस. व्ही. उजळंबे<br>२. ॲड. श्री. व्ही. वाय. पांढरे<br>३. ॲड श्री. प्रविण शेंडे<br>४. ॲड. श्री. निशिकांत देगावकर<br>५. ॲड. श्री. निलेश ठोकडे<br>६. ॲड. श्री. संतोष न्हावकर<br>७. ॲड. बसवराज एस. सलगर<br>८. ॲड. सुनिल रामचंद्र बनसोडे<br>९. ॲड. अमोल शिवानंद कळके<br>१०. ॲड. पांडुरंग लक्ष्मीकांत देशमुख<br>११. ॲड. गवई लक्ष्मीकांत अनंतराव<br>१२. ॲड. सचिन राजेंद्र लोमटे<br>१३. ॲड. विजय आर. देशपांडे<br>१४. ॲड. लक्ष्मण बाळासाहेब पाटील<br>१५. ॲड. आकाश देठे<br>१६. ॲड. सुचिता रामचंद्र ईवरे<br>१. प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता वकीलांचे पॅनल गठीत करण्यात येऊन त्यात वकीलांची नावे समाविष्ट करण्याबाबतचे अधिकार मा.कुलगुरुमहोदयांना सर्वानुमते देण्यात आले.<br>२. वरीलप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या पॅनलची मुदत तीन वर्ष राहील. तदनंतर पॅनल ॲडव्होकेटबाबत व त्यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदय यांना सर्वानुमते देण्यात आले. | |
| २. | दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८५ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | सभा व निवडणूका विभाग |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांच्याबाबत प्राप्त मे.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी दि.१०/०९/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.१५ वर पारित ठरावानुसार समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने दि.२६/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित कार्यवाहीसंबंधी अहवाल सादर केलेला असून, सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांना विभागीय चौकशीअंती सेवेतून दि.२१/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे उपकुलसचिव पदावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुध्द श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी प्रस्तुत विद्यापीठाविरुध्द मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र.०२/२०२० दाखल केलेली होती. सदर अपिलामध्ये दि.०५/०९/२०२४ रोजी मे. न्यायाधिकरणाने निकाल देताना श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी दाखल केलेले अपील क्र.०२/२०२० मान्य करण्यात आलेले आहे.<br>याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.१०/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत ठेवला असता, या प्रकरणी सदर निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाहीबाबत मा.प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने दि.२६/०९/२०२४ रोजी विद्यापीठाकडे अहवाल सादर केलेला आहे.<br>वरीलप्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाहीची बाब विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांच्याबाबत प्राप्त मे.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी दि.१०/०९/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.१५ वर पारित ठरावानुसार गठीत समितीने दि.२६/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला अहवाल स्विकारुन त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब फेरविचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१४/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास अधिष्ठातांची दोन पदे मंजूर झाले असून त्यापैकी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा हे पद डॉ. विकास कदम यांच्या कार्यमुक्तीने दि.१४/०९/२०२१ पासून रिक्त आहे. तसेच सदर पदभरती करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि.०३/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.<br>उक्त बाब विचारात घेता, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाची जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व उर्दु भाषेतील इन्कलाब वर्तमानपत्राच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.२९/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, प्रस्तुत विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच सदर पदाकरीता आवेदनपत्र सादर करणेकामी मुदतवाढीची सूचना दै. सकाळ, दै. लोकमत, दै. संचार या वर्तमानपत्राच्या दि.२८/०८/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार असल्याने व त्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) नुसार व्यवस्थापन परिषदेतून एक नवनिर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापकाच्या नामनिर्देशनाची बाब दि.१६/०८/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आली असता, व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक ०८ ला अनुसरुन सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्च सादर करण्यात यावा असा ठराव पारीत केलेला आहे.<br>सांविधिक अधिकाऱ्यांच्या निवड समितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब फेरविचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर डॉ. समाधान दिगंबर पवार यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब फेरविचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. १४/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास अधिष्ठातांची दोन पदे मंजूर झाली असून त्यापैकी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा हे पद रिक्त आहे. तसेच सदर पदभरती करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि. ०३/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.<br>उक्त बाब विचारात घेता, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाची जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व उर्दु भाषेतील इन्कलाब वर्तमानपत्राच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि. २५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.२९/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, प्रस्तुत विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच सदर पदाकरीता आवेदनपत्र सादर करणेकामी मुदतवाढीची सूचना दै. सकाळ, दै. लोकमत, दै. संचार या वर्तमानपत्राच्या दि. २८/०८/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार असल्याने व त्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) नुसार व्यवस्थापन परिषदेतून एक नवनिर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापकाच्या नामनिर्देशनाची बाब दि.१६/०८/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आलर असता, व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक ०९ ला अनुसरुन सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्च सादर करण्यात यावा असा ठराव पारीत केलेला आहे.<br>सांविधिक अधिकाऱ्यांच्या निवड समितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब फेरविचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२(२) (छ) मधील तरतुदीनुसार संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब फेरविचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. ०८/०५/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र हे शिक्षकीय संवर्गातील सांविधिक पद मंजूर झाले असून सदर पदभरती करण्यास नमूद शासन निर्णयान्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे.<br>उक्त बाब विचारात घेता, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाची जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व उर्दु भाषेतील इन्कलाब वर्तमानपत्राच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.२९/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, प्रस्तुत विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच सदर पदाकरीता आवेदनपत्र सादर करणेकामी मुदतवाढीची सूचना दै. सकाळ, दै. लोकमत, दै. संचार या वर्तमानपत्राच्या दि.२८/०८/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार असल्याने व त्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) (छ) नुसार व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या एका प्राचार्याच्या नामनिर्देशनाची बाब दि.१६/०८/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आली असता, व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक १० ला अनुसरुन सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्च सादर करण्यात यावा असा ठराव पारीत केलेला आहे.<br>शिक्षकीय संवर्गातील संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) (छ) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक प्राचार्य"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एका प्राचार्याचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२ (२) (छ) मधील तरतुदीनुसार संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब फेरविचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२(२) (छ) मधील तरतुदीनुसार संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील पुरुष कर्मचारी यांचे गणवेशाचे रंग ठरविण्याबाबत समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात नियमित शिपाई या पदावर कार्यरत असलेले पुरुष कर्मचारी यांना विद्यापीठ स्थापनेपासून दरवर्षी विद्यापीठामार्फत खाकी रंगाचे दोन गणवेश विहित प्रक्रिया करुन देण्यात येत आहेत. परंतू, शिपाई पदावरील कार्यरत पुरुष कर्मचारी यांनी पांढरा रंगाचे गणवेश देण्याबाबत दि.२१/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. सदरबाबत गणवेशाचे रंग ठरविण्याबाबत मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती. | आस्थापना विभाग |

| अ.क्र. | अध्यक्ष/सदस्यांचे नाव | धारण पद |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) प्रकाश महानवर, कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ | अध्यक्ष |
| २. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, प्र-कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| ३. | प्रा. देवानंद चिलवंत<br>मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ४. | प्रा. (डॉ.) विकास घुटे<br>प्र. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| ५. | डॉ. श्रीकांत अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| ६. | योगिनी घारे, कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य-सचिव |

सदर समितीने दि.१९/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत पुरुष कर्मचारी यांच्या गणवेशाचे रंग ठरविण्याबाबत खालीलप्रमाण शिफारस केली आहे.

विद्यापीठात कार्यरत गट ड मधील पुरुष शिपाई कर्मचारी यांनी त्यांच्या गणवेशाचा रंग खाकी ऐवजी पांढरा करण्याबाबत केलेल्या विनंतीवर सर्वंकष चर्चा होवून यावर्षी खाकी रंगाचे गणवेश देण्याचे सर्वानमुते ठरले. तसेच, पांढरा रंगाचे गणवेश देण्याची बाब धोरणात्मक असल्याने याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर करावी असे सर्वानुमते ठरले.

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील पुरुष कर्मचारी यांचे गणवेशाचे रंग ठरविण्याबाबत समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| **ठराव:** | **प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील पुरुष कर्मचारी यांचे गणवेशाचे रंग ठरविण्याबाबत समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन येथून पुढे खाकी रंगाचा गणवेश देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील महिला कर्मचारी यांच्याकरिता गणवेश (ड्रेस व साडी) खरेदीची प्रक्रिया ठरविण्यासाठी समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** | आस्थापना विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात नियमित शिपाई या पदावर कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी यांना विद्यापीठामार्फत सन २०२३ पासून मा.कुलगुरु महोदयाच्या मान्यतेनुसार तीन गणवेश (ड्रेस व साडी) देण्यात येत आहे. परंतू महिला शिपाई कर्मचारी यांची संख्या कमी असल्याने दरपत्रक प्राप्त होत नाहीत. तसेच सदरबाबत निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| अ.क्र. | अध्यक्ष/सदस्यांचे नाव | धारण पद |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) प्रकाश महानवर, कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ | अध्यक्ष |
| २. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, प्र-कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| ३. | प्रा. देवानंद चिलवंत<br>मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ४. | प्रा. (डॉ.) विकास घुटे, प्र.वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| ५. | डॉ. श्रीकांत अंधारे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ६. | योगिनी घारे, कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य-सचिव |

सदर समितीने दि.१९/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत महिला कर्मचारी गणवेश (ड्रेस व साडी) खरेदीची प्रक्रिया ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

विद्यापीठात शिपाई या पदावर कार्यरत महिला कर्मचारी यांच्याकरिता गणवेश खरेदी प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये दरपत्रके मागवून खरेदीची प्रक्रिया केल्यास चांगल्या प्रतीचे गणवेश कापड/साडी मिळत नसल्याबाबत यापूर्वी निदर्शनास आल्याने यावर्षी सुध्दा बाजारपेठेत चौकशी करुन अग्रीम घेवून न्युनतम दर असलेल्या फर्मकडून रोखीने गणवेश खरेदी करण्यास समितीने एकमताने शिफारस केली. तसेच, सदर समस्येचे कायमस्वरुपी निराकरण होणेसाठी धोरणात्मक निर्णयासाठी सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्याचे सर्वानमुते ठरले.

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील महिला कर्मचारी यांच्याकरिता गणवेश (ड्रेस व साडी) खरेदीची प्रक्रिया ठरविण्यासाठी समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील महिला कर्मचारी यांच्याकरिता अग्रीम घेवून गणवेश (ड्रेस व साडी) खरेदी करण्यास समितीने एकमताने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदर समस्येचे कायमस्वरुपी निराकरण होणेसाठी पुढील वर्षीपासून अग्रीम घेवून वर्ग ड मध्ये कार्यरत महिला शिपाई यांना खाकी रंगाची साडी देण्यात यावी असे सर्वानमुते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०८ ] | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा अधिकारी या पदाचे वेतन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत कंत्राटी सुरक्षा अधिकारी या पदाचे मनुष्यबळ घेण्यात येत असून सदरचे पद कुशल या प्रकारामध्ये असून त्यास सद्यस्थितीत शासनाच्या नियमानुसार व व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार प्रतिदिन रु.६७२.३८/- इतके वेतन हजर दिवसाप्रमाणे पुरवठादारामार्फत अदा करण्यात येते. तसेच सदर वेतनावर १३% पी.एफ. व ३.२५% ई.एस.आय. देण्यात येत आहे. तसेच सदर कंत्राटी कर्मचाऱ्याच्या वेतनामागे सेवाशुल्क अदा करण्यात येते. तसेच कंत्राटी सुरक्षा रक्षक हे पद अर्धकुशल या प्रकारामध्ये असून त्यास प्रति दिन ६४२.५४/- इतके वेतन हजर दिवसाप्रमाणे पुरवठादारामार्फत अदा करण्यात येते. तसेच सदर वेतनावर १३% पी.एफ. व ३.२५% ई.एस.आय. देण्यात येत आहे. तसेच सदर कंत्राटी कर्मचाऱ्याच्या हजर दिवसामागे निश्चित करण्यात आलेले सेवाशुल्क अदा करण्यात येते. तसेच शासनाकडून विशेष भत्त्यामध्ये वेळोवेळी वाढ केल्यानुसार वेतन पुरवठादार यांच्यामार्फत अदा करण्यात येते.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा अधिकारी या पदाचे वेतन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या कंत्राटी सुरक्षा अधिकारी यांना माहे, ऑक्टोबर, २०२४ पासून रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतके एकत्रित वेतन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच शासनाकडे सुरक्षा अधिकारी व सहायक सुरक्षा अधिकारी ही वाढीव पदे मागणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०९ ]</td><td>प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या कंत्राटी इंस्ट्रूमेंट एक्सपर्ट या पदाचे वेतन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत कंत्राटी इंस्ट्रूमेंट एक्सपर्ट या पदाचे मनुष्यबळ घेण्यात येत असून त्यास सद्यस्थितीत प्रतिमाह रु.३०,०००/- इतके एकत्रित वेतन पुरवठादारामार्फत अदा करण्यात येत आहे. तसेच सदर वेतनावर १३% पी.एफ. व ३.२५% ई.एस.आय. देण्यात येत आहे. तसेच सदर कंत्राटी कर्मचाऱ्याच्या वेतनामागे सेवाशुल्क अदा करण्यात येते.<br><br>सबब, प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या कंत्राटी इंस्ट्रूमेंट एक्सपर्ट या पदाचे वेतन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी पुरवठादार यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या कंत्राटी इंस्ट्रूमेंट एक्सपर्ट यांना माहे, ऑक्टोबर, २०२४ पासून रु.३५,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस हजार फक्त) इतके एकत्रित वेतन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>तसेच खालील बाबींसंदर्भात विभाग/संकुलांना मार्गदर्शन करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br><br>१. सर्व उपकरणे एकाच सेंटरला आणण्यासाठीची प्रक्रिया<br>२. या उपकरणांचा उपयोग करुन इंडस्ट्री व विविध संस्थासोबत एकत्र काम करणे.<br>३. या उपकरणांचा उपयोग करण्याकरिता ऑनलाईन पोर्टल वगैरे तयार करण्याकरीता मार्गदर्शन करणे इ.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>समिती सदस्याचे नांव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१.</td><td>डॉ. प्रशांत मारुती पवार</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड</td><td>सदस्य</td></tr>
</table>
</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित, मुंबई (MAHAPREIT) यांचे दिनांक २२/०८/२०२४ रोजीचे पत्र विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ व महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित, मुंबई (MAHAPREIT) यांच्या समवेत दि.०६/०५/२०२४ रोजी सौरप्रस्तावांना चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.<br>त्या अनुषंगाने संचालक, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित, मुंबई (MAHAPREIT) यांनी सेवा शुल्क आणि प्रकल्पांचा हस्तांतरण रक्कम रुपये ३६.८० कोटी (अक्षरी रुपये छत्तीस कोटी ऐंशी लाख फक्त) आणि कन्सल्टन्सी फी ६% प्रमाणे रुपये २,२०,८०,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी वीस लाख ऐंशी हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याचे दिनांक २८/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.<br>सबब, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित, मुंबई (MAHAPREIT) यांचे दिनांक २२/०८/२०२४ रोजीचे पत्र विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित, मुंबई (MAHAPREIT) यांचे नवीन प्रशासकीय इमारत व खेलो इंडिया इमारत येथे सौरऊर्जा पॅनल बसविण्यासंदर्भात दिनांक २२/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव सर्वानुमते नाकारण्यात आला आणि सदरबाबत विद्यापीठानेच सर्व प्रक्रिया करुन पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ११ ]</td><td>दि.०१/१०/२०२४ रोजीच्या तातडीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br><br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०१/१०/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br><br>विद्यापीठ परिनियम S.३३९(f) नुसार दि.०१/१०/२०२४ रोजीच्या तातडीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>सबब, दि.०१/१०/२०२४ रोजीच्या तातडीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.</td><td>अभियांत्रिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.०१/१०/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतातील विषय क्र. १३ येथील झालेल्या ठरावावर खालीलप्रमाणे सुधारित मंजुरी देऊन इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><table><tr><td>ठराव क्र. १३</td><td>पीएम-उषा योजनेंतर्गत विद्यापीठ परिसरात भौतिकशास्त्र संकूल येथील वाढीव (दुसरा मजला) बांधकामाबाबत स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यासाठी जास्तीत जास्त रुपये १,५०,०००/- + GST (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त अधिक जीएसटी) इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr></table></td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १२ ]</td><td>

**प्रस्तुत विद्यापीठातील संचालक, ज्ञानस्रोत केंद्र हे पद भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (ड) अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.७२५२०२/विशि-१, दि.०५/०५/२०२४ अन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर करीता संचालक, ज्ञानस्रोत केंद्र हे पद मंजूर होऊन सदर पदाची पदभरती करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

संचालक, ज्ञानस्रोत केंद्र हे पद भरण्यासाठी निवड प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (ड) अन्वये निवड समितीमध्ये संबंधित विषयातील विषयतज्ञ असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (ड):

"ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामितकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ञ"

उपरोक्त तरतुदीनुसार संचालक, ज्ञानस्रोत केंद्र या पदाशी संबंधित असलेल्या विषयांसाठी विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या संबंधित विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या १० विषयतज्ञांची नावे संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता यांचेकडून मागविण्यात आले होते. सदर नावे दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला असता ठराव क्र. १०१ अन्वये विद्यापरिषदेने संचालक, ज्ञानस्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीकरीता खालीलप्रमाणे ६ विषयतज्ञांची नावे व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय तज्ञांची नावे</th></tr>
<tr><td>१)</td><td>डॉ.सुभाष चव्हाण, संचालक, ज्ञानस्रोत केंद्र, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई</td></tr>
<tr><td>२)</td><td>डॉ. नंदकिशोर मोटेवार, संचालक, ज्ञानस्रोत केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई</td></tr>
<tr><td>३)</td><td>डॉ. दिपक कपाडे, ग्रंथपाल, जननायक डॉ. श्रीकांत जिजकर ज्ञानस्रोत केंद्र, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक</td></tr>
<tr><td>४)</td><td>डॉ. रमेश बाबू, मद्रास विद्यापीठ, चेन्नई</td></tr>
<tr><td>५)</td><td>डॉ. एस. शेनगुप्ता, रविशंकर शुल्का विद्यापीठ, रायपूर, छत्तीसगड</td></tr>
<tr><td>६)</td><td>डॉ. सोनल सिंग, विक्रम विद्यापीठ, उज्जैन, मध्यप्रदेश</td></tr>
</table>

</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
</table>

त्याअनुषंगाने विद्यापरिषदेच्या दि.०३/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत पारित ठराव क्र.१०१ नुसार विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ञ नामनिर्देशनासाठी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र हे पद भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

**ठराव:** प्रस्तुत विद्यापीठातील संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र हे पद भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून खालील तीन तज्ञांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.

| अ.क्र. | विषय तज्ञांची नावे |
|---|---|
| १) | डॉ. सुभाष चव्हाण, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र,<br>एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई |
| २) | डॉ. नंदकिशोर मोटेवार, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| ३) | डॉ. दिपक कपाडे, ग्रंथपाल, जननायक डॉ. श्रीकांत जिजकर ज्ञानस्त्रोत केंद्र,<br>कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक |

तसेच सदर विषयतज्ञांमधून एखादा विषयतज्ञ उपलब्ध न झाल्यास उर्वरित नाावंमधून पर्यायी नावे घेण्यास मा. कुलगुरुमहोदय यांना सर्वाधिकार देण्यात आले.

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३(१) ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदा व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्थाशी करावयाच्या करारासाठी वापरण्याची बाब मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद - राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्यामध्ये ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी मा.कुलगुरु महोदय व एनसील, पुणे यांचे मा.संचालक डॉ.आशिष लेले सर, मा.कुलसचिव, योगिनी घारे व इतर सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत करार (MOU) झाला. या सामंजस्य कराराच्या मसुद्याला मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली होती. या सामंजस्य कराराच्या अंतर्गत विद्यार्थी, शिक्षक, शास्त्रज्ञ यांचे आदान-प्रदान व कॉन्फरन्स, सेमिनार यांचे संयुक्त आयोजन, पब्लिकेशन इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.<br>एमआयटी, पुणे केंद्र सरकारच्या अंतर्गत असलेल्या C-MET, Pune, IISER, Pune यांच्यासोबतही अशा स्वरूपाचा सामंजस्य करार केल्यास विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांकरीता फायदेशीर होईल. यास्तव, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्याशी केलेल्या कराराच्या मसुद्याप्रमाणे C-MET, Pune, IISER, Pune व एमआयटी, पुणे यांच्यासोबत ही याच मसुद्यानुसार विद्यापीठाचा सामंजस्य करार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | प्लेसमेंट सेल |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या मसुद्याप्रमाणे C-MET, Pune, IISER, Pune व एमआयटी, पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१३(२)] | **विद्यापीठ नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी चालू असलेल्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेस दि.०३/११/२०२४ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन सदर योजना TATA AIG या विमा कंपनीच्या माध्यमातून लागू करुन TATA AIG विमा कंपनीस रु.३०,७०,६१६/- इतकी रक्कम प्रिमियम पोटी अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५(३७) तरतुदीच्या अधीन राहून विद्यापीठ नियमित कर्मचारी यांच्या करिता ग्रूप हेल्थ इन्शुरन्स योजना विद्यापीठ व कर्मचारी यांच्या समान आर्थिक सहभागातून राबविण्यात येते. साल २०२३-२४ करिता सदर योजना TATA AIG कंपनीमार्फत राबविण्यात येत असून सदर योजनेचा कालावधी दि.०२/११/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यापुढील १ वर्ष कालावधीसाठी सदर योजनेस मुदतवाढ देण्याची बाब प्रशासनाच्या विचारार्थ होती. वित्त व लेखा विभागाच्या अभिप्रायास अनुसरुन सदर योजनेस मुदतवाढ देण्यासाठी मा.कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशित केलेल्या समितीने बैठक घेऊन सदर सेवा समाधानकारक असल्याचा अभिप्राय दिलेला होता. सदर अभिप्राय लक्षात घेता, TATA AIG कंपनीकडून वर्ष २०२४-२५ करिता ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेचे नुतनीकरण करण्याच्या अनुषंगाने दरपत्रक मागविण्यात आलेले असून त्यांनी प्रिमियम पोटी रु.३०,७०,६१६/- इतकी रक्कम सांगितली असून, सदर रक्कम गतवर्षी दिलेल्या प्रिमियम रकमेपेक्षा रु.१,६१,६५५/- इतक्या रकमेने कमी आहे. सदर प्रिमियमची रक्कम विद्यापीठ व कर्मचारी यांच्या समान आर्थिक सहभागातून अदा करण्यात येत असल्याने सदर योजना राबविण्यापोटी विद्यापीठावर रु.१५,३५,३०८/- इतका आर्थिक भार पडणार आहे. विद्यापीठाने सदर योजना राबविण्यासाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता रु.२०,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे.<br>सबब, उपरोक्त बाबी विचारात घेता, विद्यापीठ नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी चालू असलेल्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेस दि.०३/११/२०२४ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन सदर योजना TATA AIG या विमा कंपनीच्या माध्यमातून लागू करुन TATA AIG विमा कंपनीस रु.३०,७०,६१६/- इतकी रक्कम प्रिमियम पोटी अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | आरोग्य विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी सुरु असलेल्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेस दि.०३/११/२०२४ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन सदर योजना TATA AIG या विमा कंपनीच्या माध्यमातून लागू करुन TATA AIG विमा कंपनीस रु.३०,७०,६१६/- इतकी रक्कम प्रिमियम पोटी अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [१३(३)] | **पीएम- उषा निधी अंतर्गत नवीन इमारतीचे बांधकाम व नूतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर यांच्यामार्फत करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पीएम-उषा निधी अंतर्गत विविध इमारतीचे बांधकाम व नूतनीकरण कामासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर कामासाठीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर या कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.<br>तथापि, मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर या कार्यालयास विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र. पुअहोसोविसो/अभियांत्रिकी विभाग / २०२४/७३५९, दि.०३/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पीएम-उषा निधी अंतर्गत विद्यापीठ परिसरात विविध इमारतीचे बांधकाम करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी मंजूर करण्यात आला आहे. काही नवीन इमारतीचे बांधकाम व नूतनीकरणाचे काम करण्याची बाब विचाराधीन आहे, सदरचे काम करण्यास तयार असल्याचे कळविल्यानंतर केंद्र शासनाकडून जसा निधी प्राप्त होईल व जसजसे काम होईल त्याप्रमाणे तो निधी वर्ग करण्यात येईल असे कळविण्यात आले होते.<br>त्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर यांनी जा.क्र.साबांवि-२सो/प्रशा-३/५६२०/२०२४, दि.०४/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ कार्यालयास सदर कामे ठेव अंशदान योजने अंतर्गत हाती घेण्यात येईल. काम सुरु करणेपूर्वी विभागाकडून कामाची मान्यता/मंजुरी व आवश्यक संपूर्ण निधी डी.डी. द्वारे/चेकद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर खाते क्र. ३१७६४४९२४७० आयएफसी कोड-SBIN०००३०७२ कार्यालयास जमा करण्यात यावे. तदनंतर काम हाती घेण्यात येईल. सा.बां.नियमावली परिच्छेद ३०४ (३) काम सुरु करणेपूर्वी आपल्या विभागाकडून २९२ ई मध्ये करारनामा/कबुलायतनामा (Indemnity bond) करुन सादर करणे बंधनकारक आहे. सदर बाबत आपली सहमती या कार्यालयास कळवावी जेणेकरुन पुढील निविदा प्रक्रिया हाती घेता येईल, असे कळविले आहे.<br>सबब, पीएम-उषा निधी अंतर्गत नवीन इमारतीचे बांधकाम व नूतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर यांच्यामार्फत करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **पीएम- उषा निधी अंतर्गत नवीन इमारतीचे बांधकाम व नूतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर यांच्यामार्फत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच विद्यापीठाच्या अटी व शर्ती सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर यांना मान्य नसल्यास त्यांचेऐवजी सदरचे काम विद्यापीठाने करावे असे ही सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१३(४)] | **महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/विशि-१, दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठास रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पद भरतीस मान्यता प्रदान केल्यानुसार सदर पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ अन्वये गठीत निवड समितीमधील कलम १०२ (२) (छ) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/ विशि-१, दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठास रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पद भरतीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तर सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०२४/प्र.क्र. ७५/१६-क, दि. २७ फेब्रुवारी, २०२४ नव्याने सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार (मराठा आरक्षण) सुधारित बिंदुनामावली विहित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या शिक्षक संवर्गातील बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आली आहे. तद्नंतर मा. प्रधान सचिव, १६-ब, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून बिंदुनामावली नोंदवहीची अंतिम तपासणी करुन घेण्यात आली असून, सदर सात (०७) शिक्षकीय पद भरतीची जाहिरात क्र. PAHSUS / Estab. / TP-१ / २०२४ / २१२ व PAHSUS / Estab. / TP-१ / २०२४ / २१३, दि.२४/०७/२०२४ अन्वये स्थानिक वर्तमानपत्र, AIU, इंडियन एक्सप्रेस, दैनिक लोकसत्ता, तसेच स्थानिक वर्तमानपत्र, तसेच विस्तृत जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.<br>सदर पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ नुसार निवड समिती गठीत करावी लागणार असून, निवड समितीतील १०२ (२) (छ) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावायाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची तरतूद आहे.<br>सबब, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/विशि-१, दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठास रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पद भरतीस मान्यता प्रदान केल्यानुसार सदर पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) (छ) अन्वये व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/विशि-१, दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठास रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पद भरतीस मान्यता प्रदान केल्यानुसार सदर पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ अन्वये गठीत निवड समितीमधील कलम १०२ (२) (छ) मधील तरतुदीनुसार प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१३(५)] | विद्यापीठातील नियमित पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा आढावा (Work Audit) करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | विद्यापीठातील नियमित पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा आढावा (Work Audit) करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | अध्यक्ष |
| २. | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य |
| ५. | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ६. | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य सचिव |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद